# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे– ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/११५३

दिनांक : २५/०२/२०२१

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे—०७.

**विषय : महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशावेळी आकारण्यात येणारी अनामत/सुरक्षा ठेव रक्कम विद्यार्थ्यांना परत करणेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशावेळी अनामत/सुरक्षा ठेव रक्कम आकारण्यात येते. विद्यार्थ्यांनी अनामत/सुरक्षा ठेव रक्कम परत करण्याची मागणी न केल्यास सदर रक्कम महाविद्यालयाकडे जमा असते. महाविद्यालयाकडे जमा असलेली अनामत/सुरक्षा ठेव रक्कम विद्यार्थ्यांना परत करण्यातबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. शै. प्रवेश/४३८ दि. ०३/०२/२०२० अन्वये सर्व संबधिताना कळविण्यात आलेले आहे.

तथापी, काही महाविद्यालयाकडून अनामत रक्कम परत केली जात नसल्याबाबतच्या तक्रारी विद्यापीठास प्राप्त होत आहेत. तरी, अभ्यासक्रम पुर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेली अनामत/सुरक्षा ठेव रक्कम परत करण्याबाबतची माहिती विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन देण्यात येऊन व अनामत रक्कम परत करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आपला

२५/२/२०२१

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

Desktop/vidita/circulars

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरवनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे-- ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/४३८

दिनांक : ०३/०२/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे—०७.

**विषय : महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशावेळी आकारण्यात येणारी ग्रंथालय सुरक्षा ठेव रक्कम विद्यार्थ्यांना परत करणेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशावेळी ग्रंथालय सुरक्षा ठेव रक्कम आकारण्यात येते. विद्यार्थ्यांनी सुरक्षा ठेव रक्कम परत करण्याची मागणी न केल्यास सदर रक्कम महाविद्यालयाकडे जमा असते. महाविद्यालयाकडे जमा असलेली ग्रंथालय सुरक्षा ठेव रक्कम विद्यार्थ्यांना परत करण्यातबाबत शासनाने, शासन पत्र क्रं. सहसं/उशि/पुवि/सर्व जिल्हे/२०१९/३४०० दि. १२/१२/२०१९ अन्वये कळविलेले आहे. सोबत शासन पत्राची प्रत जोडत आहे.

तरी शासनाने दिलेल्या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

कळावे,

आपला

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत : माहितीकरीता

कार्यकारी सहायक, मा. कुलगुरू कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
सहा. कुलसचिव, मा. प्र—कुलगुरू यांचे कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
कार्यकारी सहायक, मा. कुलसचिव कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

Ph.D./M.Phil Unit
Inward No.: 9409
Date : 14/12/19

# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२७८३३ E-mail : jdhepune@gmail.com फॅक्स नबर ०२०-२६०५१६३२

क्र. सहसं/उशि/पुवि/सर्व जिल्हे/२०१९ | 3400 दि. १२/१२/२०१९

**तात्काळ**

प्रति,

कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ,
पुणे

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक /क्र.आर/ 7733
दिनांक - 13/12/19
जावक दिनांक -
विभाग - PG / Academic

विषय - राज्यातील महाविदयालयामध्ये विदयार्थ्यांच्या प्रवेशावेळी आकारण्यात येणा-या ग्रंथालय सुरक्षा ठेव रक्कमेशी संबांधीत गैरकारभाराबाबत

संदर्भ - संचालनालयाचे पत्र क्र. एनजीसी/२०१९/गिरवलकर/नांवि/मवि-३/१५९२८ दि.९/१२/२०१९

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये अॅड सुरज साळुंखे यांनी राज्यातील महाविदयालयातील ग्रंथालय सुरक्षा ठेव रक्कमेच्या गैरकारभाराबाबत चौकशी करुन संबंधीतांविरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याची व महाविदयालयांकडे वर्षानुवर्षे जमा असलेली ग्रंथालय सुरक्षा ठेव रक्कम संबंधीत विदयार्थ्यांना परत करण्यास आदेशीत करण्याबाबत, ते शक्य नसल्यास सदर रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्याची विनंती केली आहे. तरी त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करावयाचा असल्याने आपला याबाबतचा अहवाल तात्काळ प्रस्तुत कार्यालयास २ प्रतीत पाठवावा.

सहसंचालक,उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे यांचेकरिता

प्रत- मा. शिक्षण संचालक,उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीसाठी

Dy. R. (P.G.) /
Dy. R. (Acad)

13/12